# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४**

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**बाब क्रमांक: ९२, रूपये:- ३,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (१) | ६२६७ | १० | पुणे जिल्हयातील जेजूरी औद्योगिक वसाहतील कंपनीमध्ये कंपन्यांमध्ये होत असलेले अपघात याबाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून जेजूरी औद्योगिक वसाहतीसह इतर ठिकाणच्या औद्योगिक वसाहतीमधील कुशल, अकुशल कंत्राटी कामगारांना वैयक्तीक सुरक्षा, कामकरीत असताना घ्यावयाची काळजी / सुरक्षा, मशनरी वापराबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. एखादी दुर्दैवी घटना घडल्यास जखमी कामगारास दिलासा, प्रथमोपचार कामगार दगावल्यास कुंटुंबियांना मिळणारे लाभ, विमा संरक्षणासाठी आपत्कालीन व्यवस्थापन समितीने तातडीने निर्णय घेऊन भविष्यात अपघाताच्या घटना थांबविण्यासाठी जेजुरी औद्योगिक वसाहतीत त्वरीत आपत्कालीन व्यवस्थापन समितीची स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | ६२६३ | १० | तळोजा (ता.पनवेल, जि. रायगड) औद्योगिक वसाहतीतील केमस्पेक केमिकल्स लि. कंपनीच्या व्यवस्थापनेने कोणतीही पूर्वसूचना न देता बेकायदेशिररित्या ठेकेदारी पध्दतीवर काम करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्त ११८ कामगारांना कामावरुन कमी केल्याचे माहे ऑगस्ट २०२३ मध्ये निदर्शनास येणे, अशा कंपनीच्या व्यवस्थापनाच्या विरोधात कामगारांनी गेट बंद आंदोलन करुनही कंपनीच्या व्यवस्थापनाकडून सहकार्य मिळत नसल्यामुळे कामगारांमध्ये कंपनी व्यवस्थापनाविरोधात प्रचंड असंतोषाची लाट निर्माण झालेली असणे, या कंपनीत ठेकेदारी पध्दतीवर काम करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्त ११८ कामगारांना कामावर घेण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८०१, वीज**<br>**बाब क्रमांक: ९३, रूपये:- १३,७७,४९,००,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (३) | ६२८३ | १० | जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील मौजे वडगांव, कुसुंबा, व कर्जाद ता. रावेर जि. जळगांव या परिसरात मोठ्या प्रमाणात केळी या पिकाची लागवड केली जाते. केळी या पिकाला बारमाई पाणी पुरवठा करावा लागतो. गेल्या अनेक दिवसांपासून या भागात वीज पुरवठा पुरेशा क्षमतेने मिळत नसल्याने शेतक-यांच्या शेती पंपाना अडचणी येत आहेत. तरी मौजे वडगांव, कुसुंबा, व कर्जाद या तिन्ही ठिकाणी ३३/११ के.व्ही चे नविन उपकेंद्र उभारल्यास शेतक-यांचा बागायती पिकांना पाणी पुरवठा सुरळीत होवून उत्पादन क्षमता वाढेल. या करिता शासन स्तरावरून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसुन याबाबत शासन व सरकार बद्दल त्यांच्या विरोध तीव्र असंतोष पसरला आहे यासाठी शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (४) | ६२७१ | १० | पुणे जिल्हयातील पुरंदर-हवेली कार्यक्षेत्रातील पुरंदर तालुक्यात दोन सबडिव्हिजन व हवेली तालुक्यात १६ गावे मुळशी, रास्तापेठ, पद्मावती, बंडगार्डन या ४ सबडिव्हिजन मध्ये विभागलेली आहेत. ही सबडिव्हिजन जाणे-येण्याच्या दृष्टीने सोयीस्कर नसल्याने ग्राहकांना आपल्या तक्रारींचे निवारण, व तांत्रिक अडीअडचणी करीता .त्याचप्रमाणे प्रशासनाला काम करताना / ग्राहकांना सेवा सुविधा, तक्रारीचे निवार करताना खुप अडचणी येत आहेत. त्यामुळे ही १६ गावे आंबेगाव व फुरसुंगी, ता. हवेली या ०२ सबडिव्हिजन मध्ये समाविष्ट करून पुरंदर तालुक्यात असलेलेली ०२ सबडिव्हिजन करीता एक नवीन डिव्हिजन होणेबाबत तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: के-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५२, उद्योग**<br>**बाब क्रमांक: ९४, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (५) | ६२७५ | १० | पुणे जिल्हयातील जेजुरी येथे औद्योगिक वसाहत असून याठिकाणी विस्तारीकरणासाठी १० वर्षापुर्वी कोळविहिरे मावडी क.प., नावळी येथील शेतजमीनीवर शिक्के मारलेले आहेत. परंतु आजपर्यंत याभागात कोणतेही नवीन उद्योग व्यवसाय न आल्याने व शेतकऱ्यांना जमीनीचे वाटप, वारस नोंदी, खरेदी-विक्री करताना अनेक अडचणी येत असल्याने प्रचंड रोषाचे वातावरण असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जेजुरी औद्योगिक वसाहत राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे लाईन, पुरेश मनुष्यबळ लगत असल्याने उद्योग व्यवसाय वाढीसाठी मोठ्या प्रमाणात वाव आहे त्यामुळे शासनाने भविष्यात गुंतवणूकी करीता येणाऱ्या उद्योग व्यवसायिकांना जेजुरी औद्योगिक वसाहतीस प्राधान्य देणेबाबत तातडीने करावयाची कार्यवाही. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई